**विशेष दिवाणी दावा क्र.९२/२०२५ मधील नि.२४ खालील आदेश**
**वैजयंता जयसिंग मुळीक वि. उत्तम गणपती मगर वगैरे**
**CNR NO.MHST050007892025**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीने सदरचा दावा हा खरेदीपत्राबाबत जाहीर ठराव मिळणेकरीता व ते रद्द होवून मिळणेकरीता तसेच ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादीने गट नं.२६९ चे इतर सह हिस्सेदार व एकत्र कुटुंबातील सदस्यांना सदर दाव्यामध्ये अत्यावश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले नसल्याने दाव्यास नॉन जॉइंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येते. वादीने प्रतिवादीकडून र.रु.९,००,०००/– स्वीकारलेनंतर प्रतिवादींना खुष खरेदीपत्र करुन दिलेले आहे. त्यामुळे वादीस त्याबाबत हरकत घेणेचा कायदेशीर अधिकार राहिलेला नाही. वादीने दि.१४.१०.२०२२ रोजीचे मुखत्यारपत्राचा दस्त क्र.२०८९/२०२२ रद्द करुन मागणीबाबत दावा दाखल केलेला आहे. परंतु वादीने सदर मागणीनुसार त्याचा वेगळा कोर्ट फी स्टॅंप दिलेला नाही. त्यामुळे वादीचा दावा विधीग्राहय नाही. वादीने केवळ खरेदीपत्र रद्द करणेसाठी म्हणून र.रु.९,००,०००/– यावरच कोर्ट फी स्टॅंप दिलेला आहे. दावा दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही. वादीचा दावा अपु–या कोर्ट फी स्टॅंपचा असलेने कायद्याने चालू शकत नाही. वादीने दाव्यामध्ये मागणी केलेली कायमची व निरंतरची ताकीद याचा कोर्ट फी स्टॅंप अदा केला नसलेने, वादीने दाव्यासोबत दिलेला तुर्तातुर्त ताकीदीचा अर्जही कायद्याने चालू शकत नाही. वादीचा ताकीदीचा अर्ज टेनेबल नसलेने, त्या आधारे वादीने नि.१८ प्रमाणे दिलेला

स्टेटसकोचा अर्ज चालविणेचा व त्यावर हुकूम करणेचा कायदेशीर अधिकार नसतानाही नि.१८ वर केलेला स्टेटसकोचा हुकूम कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन करणारा असलेने रद्द होणेस पात्र आहे. वादीने योग्य तो कोर्ट फी स्टॅंप अदा केला नसलेने वादीचे दाव्यास मुंबई कोर्ट फी ॲक्ट कलम ६(iv)(j) या तत्वाची बाधा येत असलेने वादीचा दावा रद्द होणेस पात्र आहे. म्हणून दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दाव्याचे मुल्यांकन कमी आकारुन कमी कोर्ट फी भरला असेल तर न्यायालय संबंधितांना योग्य तो कोर्ट फी देण्याचे निर्देश देवू शकतात. निर्देश दिल्यानंतरही संबंधितांनी योग्य तो कोर्ट फी भरला नसेल तर दावा काढून टाकण्याचे अधिकार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(डी) अन्वये न्यायालयास आहेत.

४. नि.३० वर म्हणणे दाखल करुन वादीने दाव्याची आकारणी कायद्याप्रमाणे करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅंप दिल्याचे कथन केलेले आहे. दस्त क्र. २१५०/२०२५ चे दस्तास वादी समक्ष हजर नव्हती. वादीतर्फे मुखत्यार प्रतिवादी क्र.२ संग्रामसिंह शंकरराव खरात याने प्रतिवादी क्र.१ याचे लाभात सदरचा तथाकथीत दस्त लिहून दिलेला आहे. सदर दस्ताबाबत व त्यातील मोबदला याचेबाबत वादीस कोणतीही माहिती नव्हती. प्रतिवादी यांनी अस्तित्वात आणलेले तथाकथीत मुखत्यारपत्र व खरेदीपत्र हे एकाच मोबदल्यावरुन अस्तित्वात आणलेले आहे. मुखत्यारपत्र दस्त हा खरेदी दस्ताचाच भाग आहे. त्यामुळे वादीने केलेली दाव्याची आकारणी ही योग्य आहे. मंडल अधिकारी यांचे न्यायालयात तक्रार रजिष्टर नं.५८/२०२५ फेरफार क्रमांक

१५३२ चे प्रकरण सुरु झालेले आहे. याबाबत प्रतिवादींनी जाणूनबुजून या अर्जाचे कामी कथने केलेली नाहीत. मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ मधील कलम ५३अ या तरतुदींचा या दाव्याशी कोणतेही स्वरुपाचा संबंध येत नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबविणेचे हेतूने प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादींनी दावा दाखल करताना र.रु.११,२५५/– कोर्ट फी भरलेली आहे. वादीने दाव्याचे मुल्यांकन र.रु.९,००,०००/– असे दाखवलेले आहे. त्यानुसार वादीने भरलेला कोर्ट फी हा बॉम्बे कॉर्ट फी ॲक्ट कलम ६(iv)(ha) मधील तरतुदीनुसार योग्य आहे. दावा गुणदोषावर चालल्यानंतर कोर्ट फी कमी आहे असे निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे कोर्ट फी भरण्याचे निर्देशही देण्यात येतील. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर होणे न्यायोचित आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.02.12 17:05:05 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – ११/०२/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.